अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# कायदा आणि सुव्यवस्था यांचाच घटस्फोट

अनेक वेळेला कायदा आणि सुव्यवस्था याविषयी प्रश्न उपस्थित होत असतात. राज्यातली गुन्हेगारी कमी होणे म्हणजे तिथली कायदा आणि सुव्यवस्था खूप व्यवस्थित आहे असे समजण्याचे कारण नाही. कायदा आणि सुव्यवस्था या दोन्ही संकल्पनांचा नीट अर्थ लावला तर कायद्याची योग्य अंमलबजावणी होत राहिली तर आपोआप सुव्यवस्था होत राहते. दुर्दैवाने आज कायद्याचीच नीट अंमलबजावणी होत नाही आणि त्यामुळे समाजातली सुव्यवस्था राखणे अशक्य होते. किंबहुना ती कोणाच्याच नियंत्रणात राहात नाही. एकूणच दिल्लीपासून गल्लीपर्यंत कायदा आणि सुव्यवस्था या विषयाची कधीही गंभीरपणे चर्चा होत नाही. त्याची दखल घेतली जात नाही आणि तितक्याच परिपक्व बुध्दीतून त्याची अंमलबजावणी होत नाही. अलिकडेच प्रजा फाऊंडेशन या संस्थेने मुंबईत गुन्हेगारी वाढली असल्याचा निष्कर्श काढला. तर दुसरीकडे महाराष्ट्र कस्टडीत असलेले आरोपी मृत्यूमुखी पडण्याच्या प्रकारात आघाडीवर असल्याचे आढळून आले. संपूर्ण देशात गेल्या पाच वर्षांत अटकेत असलेल्या आरोपींपैकी जवळपास ११,८२० आरोपींचा कस्टडीतच मृत्यू झाल्याचे आढळून आले आणि एकट्या महाराष्ट्रमध्ये हे प्रमाण ७२ असल्याचेही समोर आले आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल झाली आहे. इतक्या मोठ्याप्रमाणात कस्टडीत आरोपींचे मृत्यू होणे याचा अर्थ पोलिसांकडून होणारी मारहाण तसेच कस्टडीत असलेले अयोग्य वातावरण हे प्रमाण वाढल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने सगळ्या राज्यसरकारांना नोटीसा पाठवून याबाबत कोणकोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत आणि कस्टडीतील आरोपींच्या मृत्यूचे प्रमाण रोखण्याविषयीची विचारणा केलेली आहे. आरोपी मोकाट असोत, किंवा अटक झालेले असोत त्यांच्यावर कायद्यानुसार नियंत्रण ठेवणे हा सरकारचा सुव्यवस्था राखण्याच्या प्रयत्नाचा महत्त्वाचा भाग ठरतो. आज कायदाच धाब्यावर बसवला जातोय. योग्य पध्दतीने योग्य त्या कालावधीत त्याची अंमलबजावणी होत नाही. दिरंगाई केली जाते आणि त्यातून एकूणच सामाजिक गैरव्यवस्थेचे प्रकार घडतात. या सगळ्या मुद्यांचा विचार केल्यानंतर कायदा-सुव्यवस्था या विषयाबाबत खरे तर सरकारी आणि सामाजिक पातळीवर चर्चा होणे महत्त्वाचे आहे. यासंदर्भात पोलीस यंत्रणांची, समाजाची, सरकारची नेमकी भूमिका काय आहे, याचेही विश्लेषण होण्याची गरज आहे.

## केवळ पोलिसांची जबाबदारी नाही

आज कायदा आणि सुव्यवस्था हा केवळ पोलीस खात्याचा विषय मानला जातो. राज्याच्या तसेच केंद्राच्या गृहमंत्रालयाची ती जबाबदारी ठरवली जाते. एकाअर्थी कामांची विभागणी पाहता ही जबाबदारी योग्य जरी असली तरी गुन्ह्यांचे अनेक प्रकार घडत असतात. त्यात पैशाची अफरातफर तसेच लाचलुचपत बनावट कागदपत्रे चुकीची माहिती देऊन फसवणूक करणे इथपासून ते खून मारामाऱ्या, दरोडे, अपहरण व वेगवेगळ्या पध्दतीचे अत्याचार या सगळ्यांचा समावेश होतो. अशाप्रकारे गुन्हे करणारे लोक समाजाच्या सर्व क्षेत्रात पहायला मिळतात. मग कधी कधी शाळेच्या मुख्याध्यापकांकडून, शिक्षकांकडून तर कधी पत्रकारांकडूनही अत्याचाराचे प्रकार घडतात. राजकारणी कलाकार अगदी स्वत:ला गौरवणारे लेखकदेखील वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या गुन्ह्यांमध्ये अडकत असतात. भ्रष्टाचार हा तर समाजातल्या सगळ्या क्षेत्राचा केंद्रबिंदू आहे. मिळेल त्या मार्गाने पैसा ओरबाडणे खोटी कागदपत्रे दाखवणे हे सगळे प्रकार घडण्याचे एकमेव कारण म्हणजे त्या-त्या क्षेत्रामध्ये असलेल्या नियमांचे पालन केले जात नाही. समाजाची घडी सुव्यवस्थित राहावी म्हणून जे काही कायदे तयार केले गेले आहेत. त्या कायद्यांचाही धाक न बाळगता आपल्या फायद्याचा विचार केला जातो आणि मग एकूणच समाजात वेगवेगळ्या पध्दतीच्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत जाते. याचा अर्थ मुळात कायदे कशासाठी केले आहेत याचीच योग्य ती जाणीव समाजही ठेवत नाही आणि त्याची अंमलबजावणी करणारेदेखील बाळगत नाहीत. उलट कायद्याचा अजिबात विचार न करता अनेक गोष्टी दडपून नेण्याचा प्रयत्न केला जातो. अशा या सगळ्या विसंगत बेफिकीर आणि बेजबाबदार वर्तनातून कायद्याला आणि सुव्यवस्थेला कधीही एकत्र राहू दिले जात नाही. खरे तर कायदा आणि सुव्यवस्था यांचाच संसार सध्या विस्कटलेला आहे. त्यांच्यातच घटस्फोट झाल्याने समाजातल्या या अंदाधुंदीलाही ऊत आलेला आहे.

## कायद्याला वळसा

म्हणजे या सगळ्याचा कडेलोट कसा होतो ते पहा. ज्या संसद आणि विधिमंडळांमधून समाजातल्या सुव्यवस्थेसाठी कायदे तयार होतात. तिथेसुध्दा त्यांनीच बनवलेल्या कायद्यांची तिथेच पायमल्ली होण्याचे प्रकार होतात आणि इथूनच कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाची सुरुवात होते. सभागृहामध्ये चालणारा हा गोंधळ सभागृहाचे नियम धाब्यावर बसवून केला जाणारा आरडाओरडा हे सगळे प्रकार कायदा तयार करणाऱ्यांकडून होतात. त्यावेळेला सुव्यवस्था नेमकी कोणी राखायची? असा प्रश्न निर्माण होतो. पोलिसांनी ती राखायची पण पोलिसांमध्येदेखील कायद्याचा धाक नाही. उलट पळवाटा काढून सुव्यवस्थेचीच फसवणूक करण्याचे प्रकार दिवसाढवळ्या घडतात. अगदी ट्रॅफिक पोलिसापासून ते तलाठ्यापर्यंत दाखला मिळवण्यापर्यंत कायद्याला कसा वळसा घातला जातो हे अनेकवेळेला पहायला मिळते. कोणीच कायदेशिरपणे काम करायला तयार नाही आणि मग सुव्यवस्थाही टिकायला तयार नाही. म्हणूनच या संकल्पनेची जाहीर आणि गंभीर चर्चा होणे गरजेचे आहे.